स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखा अंतर्गत पीएच.डी. (मराठी) पदवी करिता सादर करावयाच्या नियोजित शोध प्रबंधाचे प्रारुप (synopsis)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शोध प्रबंधाचे शीर्षक

आंबेडकरी कवितेतील जीवनमूल्ये:एक चिकित्सक अभ्यास

(कालखंड २००१ते २०२०)

संशोधक

पंजाब पुंजाजी टापरे

मु.पो. बाभुळगांव ता.सेनगांव जि. हिंगोली-४३१७०३

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. शत्रुघ्न जाधव

मराठी विभाग प्रमुख (पदवी व पदव्युत्तर)

आदर्श महाविद्यालय, हिंगोली-४३१५१३

प्रास्ताविक

मराठी साहित्याच्या विश्वामध्ये दलित साहित्याचा झालेला उगम ही एक ऐतिहासिक वाङ्मयीन घटना आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व, त्यांचे विचार, त्यांचे लेखन, त्यांनी केलेला जीवनसंघर्ष ही या ऐतिहासिक वाङ्मयीन घटना असलेल्या दलित साहित्याची प्रेरणा आहे. 'दलित साहित्य' या नावाने प्रचलित आणि प्रस्थापित झालेल्या या साहित्य प्रवाहाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आणि ऊर्जा असल्याने, या साहित्याला 'आंबेडकरी साहित्य' असे म्हटले जाऊ लागले.अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा जन्मत:च दलित साहित्याने स्वीकारली असल्याने त्या साहित्याचे नाव 'दलित साहित्य ' असे असले तरी, या साहित्याचे स्वरुप 'आंबेडकरी ' आशयाचे आहे. या अर्थानेही या साहित्य प्रवाहाला 'आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य' अर्थात 'आंबेडकरी साहित्य' म्हटले जाते.

सत्तर-पंच्याहत्तर वर्षांच्या कालखंडातील कविता,कथा,कादंबरी,नाटक,आत्मकथन, चरित्र, निबंध व समीक्षा अशा सगळ्या वाङ्मय प्रकारांच्या रुपात लिहिले गेलेले 'आंबेडकरी साहित्य' अफाट आहे.त्यातल्या त्यात आंबेडकरी साहित्याचा प्रारंभकाळ म्हणजेच उगम हा काव्य निर्मितीने झालेला आहे.म्हणून या काव्यदालनात प्रचंड स्वरुपात कविता लिहिल्या गेली.२००१ ते २०२० या वीस वर्षांच्या कालखंडात आंबेडकरी कविता वेगवेगळ्या वाटांनी आणि वळणांनी विकसित झालेली आहे. या दोन दशकातील आंबेडकरी कवितेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानातील स्वीकारलेली मूल्ये कशा स्वरुपात आविष्कृत केली, हा माझ्या संशोधनाचा विषय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या युगपुरुषाच्या विचारांची परंपरा फुले, शाहू, संत गाडगेबाबा पासून छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, संत कबीर, संत रविदास ते गौतम बुध्द; इतकी व्यापक आहे. या सर्व महापुरुषांच्या तत्त्वज्ञानातून जी जीवनमूल्ये निर्धारीत होतात, तीच जीवनमूल्ये भारतीय संविधानामधून उद्घोषित झालेली आहेत.अशा सगळ्या जीवनमूल्यांमधून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या पाच जीवनमूल्यांच्या अनुषंगाने दोन दशकातील आंबेडकरी कवितेचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे.

या जीवन मूल्यांच्या परिपोषातून या कालखंडातील आंबेडकरी कविता आशय व अभिव्यक्तीच्या संदर्भात कशी- कशी बदलत गेली, याचाही या ठिकाणी चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे. त्या सोबतच प्रस्थापित मराठी कवितेचा प्रवाह या आंबेडकरी कवितेने कितपत प्रभावित केला, या अनुषंगानेही या दोन दशकातील आंबेडकरी कवितेचा अभ्यास करावयाचा आहे.

- **संशोधनाचा उद्देश**

१) जीवनमूल्यांच्या दृष्टिकोणातून आंबेडकरी कवितेची चिकित्सा करणे.
२) आंबेडकरी कवितेतील जीवनमूल्यांचे स्वरुप कसे आहे, याचे समग्र विश्लेषण करणे.
३) आंबेडकरी कवितेने प्रस्थापित मराठी कवितेला मानवी मूल्ये अंगिकारण्यास कितपत प्रवृत्त केले याची मीमांसा करणे.
४) दोन दशकातील आंबेडकरी कविता कशी बदलत गेली याचा मागोवा घेणे.
५) जीवनमूल्यांचा अंगिकार करण्यास आंबेडकरी कविता कुठे-कुठे व कशी-कशी कमी पडली याचाही शोध घेणे.

- **संशोधन विषयाची निवड**

आंबेडकरी साहित्याचा आजवर विविध अंगाने अभ्यास झालेला आहे. आंबेडकरी कवितेचेही विभिन्न दृष्टिकोणातून आकलन, अध्ययन व संशोधन झालेले आहे. परंतु जीवनमूल्यांच्या दृष्टिकोणातून आंबेडकरी कवितेचे स्वतंत्रपणे संशोधन झाल्याचे आढळून येत नाही. म्हणून किमान २० वर्षांची 'आंबेडकरी कविता' जीवनमूल्यांच्या अनुषंगाने अभ्यासणे असे माझ्या मनात आले. त्यामुळे हा विषय मी संशोधनासाठी निवडला आहे.

- **संशोधनाची गृहितके**

१) आंबेडकरी कविता प्रस्थापित मराठी साहित्याच्या तुलनेत जीवनमूल्यांचा अधिक प्रकर्षाने अंगिकार करते.

२) एकूणच मराठी साहित्यविश्वात आंबेडकरी कवितेने आपला वेगळा ठसा उमटविला याचे कारण या कवितेने जीवनमूल्यांचा मूलत:च केलेला अंगिकार होय.

३) प्रस्थापित मराठी कवितेला आशय व अभिव्यक्तीच्या पातळीवर परिवर्तनाची दिशा देण्याचा प्रयत्न आंबेडकरी कवितेने केलेला आहे.

४) मानवी जीवनमूल्यासंदर्भात या कवितेने प्रस्थापित मराठी कवितेच्या प्रांतात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

५) जीवनमूल्यांचा अंगिकार ही आंबेडकरी कवितेची मूलप्रवृत्ती आहे.

६) जीवनमूल्यांच्या अंगिकारात आंबेडकरी कविता यशस्वी ठरली. तशी अयशस्वी ठरल्याचे चित्रही पाहावयास मिळते.

- **संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

अ) **व्याप्ती -** संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. मराठी कवितेचे क्षेत्र विस्तीर्ण आहे. त्या अनुषंगाने मी 'आंबेडकरी कवितेतील जीवनमूल्ये: एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले आहे. या संशोधनाची व्याप्ती ठरवितांना त्याचा कालखंड लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.म्हणून मी या संशोधनाचा कालखंड २००१ ते २०२० हा ठरविला आहे.

आ) **मर्यादा -** स्वातंत्र्योत्तर काळ व २००० नंतरचा काळ या काळात मराठी कविता प्रचंड प्रमाणात लिहिल्या गेली. त्या काव्यदालनातील केवळ 'आंबेडकरी कविता' प्रस्तुत अभ्यासासाठी घेतली आहे. आंबेडकरी कवितेचाही इतिहास फार मोठा आहे. १९६०-६५ पासून निर्माण झालेल्या आंबेडकरी कवितेतील केवळ वीस वर्षातील कविताच अभ्यासासाठी निवडली आहे. या मर्यादेमुळे मला या कवितेतील जीवनमूल्यांचा चिकित्सक शोध घ्यावयास मदत होईल. जीवनमूल्यांची यादीही बरीच मोठी आहे.त्यामुळे मी संशोधन कार्यासाठी केवळ समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या पाच जीवनमूल्यांची निवड करुन माझ्या संशोधनाची मर्यादा आखून घेतली आहे. **'आंबेडकरी कवितेतील जीवनमूल्ये: एक चिकित्सक अभ्यास'** या प्रस्तावित शोध प्रबंधाची प्रकरणनिहाय रुपरेषा पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले - आंबेडकरी कविता व जीवनमूल्ये यांच्या परस्पर संबंधाचे स्वरुप

अ) आंबेडकरी साहित्याचे स्वरुप

I. प्रांरभापासून२००० पर्यंतचा कालखंड

II. २००१ पासून २०२० पर्यंतचा कालखंड

आ) प्रस्थापित मराठी साहित्याचे स्वरुप

I. प्रस्थापित मराठी साहित्य

II. प्रस्थापित मराठी साहित्य व आंबेडकरी साहित्य यांच्यातील साम्य व भेद

इ) प्रस्थापित मराठी कविता व मूल्यविचार

I. जीवनमूल्ये

II. वाङ्मयीन मूल्ये

ई) आंबेडकरी कविता व मूल्यविचार

I. वाङ्मयीन मूल्ये

II. जीवनमूल्ये

III. संविधानिक मूल्ये

IV. नीतीमूल्ये

V. मानवी मूल्ये

उ) आंबेडकरी कविता व जीवनमूल्ये यांचा परस्परसंबंध

I.जीवनमूल्यांचे स्वरुप

II.आंबेडकरी कवितेतून अभिव्यक्त झालेली जीवनमूल्ये

प्रकरण दुसरे - आंबेडकरी कवितेतील 'समता' मूल्याचे स्वरुप

अ) 'समता' मूल्याचा उगम व इतिहास

I 'समता' मूल्याचा उगम

II 'समता' मूल्याचा इतिहास

आ) 'समता' मूल्याबाबत विचारवंतांची मते

I भारतीय विचारवंत

II पाश्चात्य विचारवंत

इ) 'समता' मूल्याचे प्रकार

I. सामाजिक 'समता'

II. राजकीय 'समता'

III. आर्थिक 'समता'

IV. इत्यादी

ई) सामाजिक 'समता' मूल्याचे स्वरुप

उ) आंबेडकरी कवितेतील 'समता' मूल्याचे स्वरुप

ऊ) प्रस्थापित मराठी कवितेतील 'समता' मूल्याचे स्वरुप

ए) मूल्यमापन

ऐ) निष्कर्ष

संदर्भ सूची

प्रकरण तिसरे - आंबेडकरी कवितेतील 'स्वातंत्र्य' मूल्याचे स्वरुप

अ) 'स्वातंत्र्य' मूल्याचा उगम व इतिहास

I. 'स्वातंत्र्य' मूल्याचा उगम

II. 'स्वातंत्र्य' मूल्याचा इतिहास

आ) 'स्वातंत्र्य' मूल्याबाबत विचारवंतांची मते

I. भारतीय विचारवंत

II. पाश्चात्य विचारवंत

इ) 'स्वातंत्र्य' मूल्याचे प्रकार

I. व्यक्ती स्वातंत्र्य

II. सामाजिकस्वातंत्र्य

III. राजकीय स्वातंत्र्य

IV. आर्थिक स्वातंत्र्य

V. इत्यादी

ई) आंबेडकरी कवितेतील 'स्वातंत्र्य' मूल्याचे स्वरुप

उ) प्रस्थापित मराठी कवितेतील 'स्वातंत्र्य' मूल्याचे स्वरुप

ऊ) मूल्यमापन

ऐ) निष्कर्ष

संदर्भ सूची

प्रकरण चौथे - आंबेडकरी कवितेतील 'बंधुता' मूल्याचे स्वरुप

अ) 'बंधुता' मूल्याचा उगम व इतिहास

I. 'बंधुता' मूल्याचा उगम

II. 'बंधुता' मूल्याचा इतिहास

आ) 'बंधुता' मूल्याबाबत विचारवंतांची मते

I. भारतीय विचारवंत

II. पाश्चात्य विचारवंत

इ) 'बंधुता' मूल्याचे प्रकार

I. मानवी 'बंधुता'

II. विश्व 'बंधुता'

III. इत्यादी

ई) आंबेडकरी कवितेतील 'बंधुता' मूल्याचे स्वरुप

उ) प्रस्थापित मराठी कवितेतील 'बंधुता' मूल्याचे स्वरुप

ऊ) मूल्यमापन

ऐ) निष्कर्ष

संदर्भ सूची

प्रकरण पाचवे - आंबेडकरी कवितेतील 'न्याय' मूल्याचे स्वरुप

अ) 'न्याय' मूल्याचा उगम व इतिहास

I. 'न्याय' मूल्याचा उगम

II. 'न्याय' मूल्याचा इतिहास

आ) 'न्याय' मूल्याबाबत विचारवंतांची मते

I. भारतीय विचारवंत

II. पाश्चात्य विचारवंत

इ) 'न्याय' मूल्याचे प्रकार

I. सामाजिक 'न्याय'

II. आर्थिक 'न्याय'

III. राजकीय 'न्याय'

ई) आंबेडकरी कवितेतील 'न्याय' मूल्याचे स्वरुप

उ) प्रस्थापित मराठी कवितेतील 'न्याय' मूल्याचे स्वरुप

ऊ) मूल्यमापन

ऐ) निष्कर्ष

संदर्भ सूची

प्रकरण सहावे - आंबेडकरी कवितेतील 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचे स्वरुप

अ)'धर्मनिरपेक्षता' मूल्याचा उगम व इतिहास

I. 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचा उगम

II. 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचा इतिहास

आ) 'धर्मनिरपेक्षता' मूल्याबाबत विचारवंतांची मते

I. भारतीय विचारवंत

II. पाश्चात्य विचारवंत

इ) 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचे स्वरुप

ई) आंबेडकरी कवितेतील 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचे स्वरुप

उ) प्रस्थापित मराठी कवितेतील 'धर्मनिरपेक्षता' मूल्याचे स्वरुप

ऊ) मूल्यमापन

ऐ) निष्कर्ष

संदर्भ सूची

प्रकरण सातवे - उपसंहार / समारोप

अ) साधन ग्रंथ सूची

आ) संदर्भ ग्रंथ सूची

इ) नियतकालिके - मासिके, दैनिके, इत्यादी

संशोधक

पंजाब पुंजाजी टापरे
मु.पो. बाभुळगांव ता.सेनगांव जि. हिंगोली
मो.नं. ९६७३१८९२४३, ८२०८६३५३३०
ई-मेल :-panjabtapre@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

डॉ. शत्रुघ्न जाधव
मराठी विभाग प्रमुख (पदवी व पदव्युत्तर)
आदर्श महाविद्यालय,हिंगोली
मो.नं. 9822242262
ई-मेल :-shatrughnagjadhav@gmail.com